। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १७६ वा । बुधवार, दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

## ५० व्या ग्रंथ भेट योजनेअंतर्गत १३८८ ग्रंथांची यादी जाहीर; १५ ऑक्टोबरपर्यंत सूचना मागवल्या

**लातूर/प्रतिनिधी** : राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता आणि राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून ५० व्या ग्रंथ भेट योजनेअंतर्गत २०२३ मध्ये प्रकाशित व ग्रंथालय संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथांपैकी राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या उपसमितीने निवडलेल्या १३८८ ग्रंथांची (मराठी ७४९, हिंदी २९७, इंग्रजी ३४२) यादी www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर २६ सप्टेंबर २०२५ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या यादीतील ग्रंथ किमान २५ टक्के सूट दराने वितरित करणे बंधनकारक आहे. या ग्रंथ यादीतील कोणत्याही ग्रंथाबाबत सूचना, हरकती किंवा आक्षेप असल्यास १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४००००१ यांच्याकडे लेखी स्वरूपात कार्यालयीन वेळेत हस्तपत्राद्वारे, पोस्टाने किंवा संकेतस्थळावर नमूद ई-मेलद्वारे पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त सूचनांचा विचार केला जाणार नाही. ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक किंवा किंमतीत बदल असल्यास त्याबाबत माहिती देण्याचे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक तथा अध्यक्ष अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

## लातूर येथे ३ ऑक्टोबर रोजी दिव्यांग बालकांसाठी ओळख व तपासणी शिबीर

**लातूर/प्रतिनिधी** : मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीच्या १७ जुलै २०२५ रोजीच्या आदेशानुसार लातूर येथील दिव्यांग बालकांची तपासणी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी ओळख व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात लातूर येथील दिव्यांग बालकांनी त्यांच्या पालकांसह उपस्थित राहून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका, सचिव व्ही.एन. गिरवलकर, आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले आहे.

# अनेकदा संघाला संपवण्याचे प्रयत्न झाले, तरीही संघ वटवृक्षासारखा ठाम उभा आहे : पंतप्रधान मोदी



### विशेष टपाल तिकिट आणि नाणे जारी

संघाच्या १०० वर्षांच्या गौरवमयी प्रवासाच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारत सरकारने विशेष टपाल तिकिट आणि १०० रुपयांचे स्मृती नाणे जारी केले. या नाण्यावर एका बाजूला भारताचे राष्ट्रीय चिन्ह असून दुसऱ्या बाजूला सिंहासह वरदमुद्रेतील भारतमातेची प्रतिमा आहे.

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : 'स्वतंत्र्यानंतर अनेक वेळा संघाला संपवण्याचे, चिरडण्याचे प्रयत्न झाले, तरीही संघ वटवृक्षासारखा ठाम उभा राहिला. प्रत्येक स्वयंसेवकाने नेहमी समाजासाठी काम केले,' अशा भावना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केल्या. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त नवी दिल्लीतील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

पीएम मोदी पुढे म्हणतात, 'संघाच्या या प्रवासात अनेकदा हल्ले झाले, संघाला मुख्य प्रवाहात येण्यापासून रोखण्यासाठी षड्यंत्रे झाली. स्वतंत्रतेनंतर संघाला संपवण्याचे प्रयत्न झाले. परमपूज्य गुरुजींना (गोलवलकर गुरुजी) खोट्या खटल्यात अडकवून जेलमध्ये टाकण्यात आले. पण जेव्हा ते जेलमधून बाहेर आले, तेव्हा त्यांनी एक प्रेरणादायी उदाहरण दिले. 'कधी कधी जीभ दातांखाली येते, दाबली जाते, चिरडली जाते. पण आपण दात मोडत नाही, कारण दातही आपलेच आहेत आणि जीभही आपलीच आहे.''

मोदी पुढे म्हणतात, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या औचित्याने संघाच्या प्रवासाचा आढावा घेताना 'राष्ट्रनिर्माणाचा महान उद्देश आणि व्यक्तिनिर्माणाचा स्पष्ट मार्ग' हा संघाच्या कार्याचा केंद्रबिंदू ठरल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. शाखा ही साधी, सोपी आणि जीवन्त कार्यपद्धती संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा पाया मानला गेला आहे. संघाच्या स्थापनेपासूनच एकच भाव ठाम राहिला आणि तो म्हणजे राष्ट्र प्रथम आणि एकच ध्येय नजरेसमोर ठेवले आहे, ते म्हणजे एक भारत, श्रेष्ठ भारत.

पंतप्रधान मोदी यांनी पुढे सांगितले, 'प्रत्येक स्वयंसेवकाने अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला. संघाच्या विचारधारेनुसार कोणताही हिंदू लहान किंवा मोठा नाही. प्रत्येक आपत्तीत स्वयंसेवक मदतीसाठी धावून गेले. कोरोना काळातही स्वयंसेवक देशवासीयांच्या मदतीसाठी पुढे सरसावले.

संघाने 'एक विहीर, एक मंदिर आणि एक स्मशान' ही संकल्पना मांडली. आजही प्रत्येक स्वयंसेवक भेदभावाविरुद्ध लढत आहे.' 'आज महानवमी आहे. उद्या विजयादशमी महापर्व आहे. हा दिवस अन्यायावर न्यायाचा, असत्यावर सत्याचा आणि अंधःकारावर प्रकाशाचा विजय दर्शवतो. हाच भारतीय संस्कृतीचा संदेश आहे. अशा पवित्र विजयादशमीच्या काळात १०० वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली, हा योगायोग नव्हता. ही आपल्या राष्ट्रचेतनेची पुनःप्रकट झालेली परंपरा होती. आज आपल्या पिढीला संघाचे शताब्दी वर्ष पाहण्याचे भाग्य लाभले आहे. मी या प्रसंगी देशसेवेसाठी समर्पित लाखो स्वयंसेवकांना शुभेच्छा देतो आणि संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो,' असेही पीएम मोदी म्हणाले. 'भारताच्या विभाजनाच्या वेदनेत लाखो कुटुंबे बेघर झाली होती. त्या वेळी स्वयंसेवकांनी शरणार्थ्यांची निःस्वार्थ सेवा केली. संविधानिक संस्थांबद्दलची आस्था आणि समाजाशी असलेली आत्मीयता यांनी प्रत्येक स्वयंसेवकाला स्थितप्रज्ञ आणि संवेदनशील ठेवले. संघाबद्दल म्हटले जाते की, येथे सामान्य माणसे एकत्र येऊन असामान्य आणि अभूतपूर्व कार्य करतात. ही व्यक्तिनिर्मितीची सुंदर प्रक्रिया आजही संघाच्या शाखांमध्ये पाहायला मिळते. संघ शाखेचे मैदान ही अशी प्रेरणाभूमी आहे, जिथे स्वयंसेवकाचा प्रवास 'अहं' पासून 'वयं' पर्यंत होतो. शाखा म्हणजे व्यक्तिनिर्माणाची यज्ञवेदी असून, तीच संघाच्या शतकभराच्या कार्याची खरी ओळख आहे.'

## १ ऑक्टोबरपासून आधार अपडेटसाठी नवीन दर लागू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : आधार कार्ड हे भारतीय नागरिकांसाठी एक महत्त्वाचे ओळखपत्र आहे. कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ घेण्यासाठी ते अनिवार्य आहे. हे कार्ड युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडियाद्वारे जारी केले जाते. आधार कार्डशी संबंधित कोणतेही अपडेट 'युआयडीएआय'च्या माध्यमातूनच केले जाते. १ ऑक्टोबरपासून आधार अपडेटसाठी नवीन शुल्क लागू केले आहे.

**आधार कार्ड विनामूल्य बनते का?**

UIDAI च्या नियमांनुसार, नवीन आधार कार्ड बनवणे हे सर्वांसाठी विनामूल्य (मोफत) आहे. नागरिक त्यांच्या जवळच्या आधार सेवा केंद्रात जाऊन आपले आधार कार्ड बनवू शकतात.

**बायोमेट्रिक अपडेटसाठी किती पैसे मोजावे लागणार**

UIDAI ने १ ऑक्टोबरपासून आधार अपडेटसाठी नवीन शुल्क लागू केले आहेत. या नवीन बदलांनुसार, बायोमेट्रिक अपडेट (उदा. फिंगरप्रिंट, डोळ्यांची आयरीस किंवा फोटो बदलणे) करण्यासाठी नागरिकांना १२५ रुपये शुल्क भरावे लागेल. ७ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या बायोमेट्रिक अपडेटसाठीही १२५ रुपये शुल्क आकारले जाईल. ३० सप्टेंबरपर्यंत हे अपडेट मोफत होते.डिजिटल सदस्यता

**नाव, पत्ता अपडेटसाठी शुल्क**

आधार कार्डमधील डेमोग्राफिक अपडेट्स (उदा. नाव, लिंग, जन्मतारीख, पत्ता, मोबाईल नंबर किंवा ईमेल ड्रेस अपडेट करणे) यासाठी ७५ रुपये शुल्क आकारले जाईल. मात्र, हे अपडेट बायोमेट्रिक अपडेटसोबत केले तर ते मोफत असेल. तुम्ही हे अपडेट ऑनलाईन केले, तर ते विनामूल्य असेल, परंतु




आधार केंद्रावर यासाठी तुम्हाला ७५ रुपये शुल्क द्यावे लागणार आहे.

**लहान मुलांसाठी प्रथम बायोमेट्रिक अपडेट मोफत**

५ ते ७ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांचे बायोमेट्रिक अपडेट जर पहिल्यांदा केले जात असेल, तर ते आता मोफत आहे. तथापि, दुसऱ्या वेळेस बायोमेट्रिक अपडेटसाठी १२५ रुपये शुल्क द्यावे लागेल.

**१० वर्षांपेक्षा जुने आधार कार्ड अपडेट अनिवार्य**

UIDAI ने १० वर्षे किंवा त्याहून अधिक जुने असलेले आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे, जर तुमचे आधार कार्ड १० वर्षांपासून अपडेट झाले नसेल, तर ते त्वरित अपडेट करून घेणे अनिवार्य आहे.

## इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील उच्च विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा

**लातूर/प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लातूर येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलींचे व मुलांचे १०० विद्यार्थी क्षमतेचे प्रत्येकी एक वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृहात विद्यार्थ्यांची भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य याची निःशुल्क व्यवस्था करण्यात येते. सन २०२५-२६ साठी रिक्त असलेल्या जागेवर वसतिगृह प्रवेशासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर २६ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वसतिगृहात प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्यांने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत.

वरील अटींची पूर्तता करत असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल श्रीमती वृषाली बडे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२६११८३) यांचेशी संपर्क करावा किंवा लातूर येथील मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल तिरुके सुरज (भ्रमणध्वनी क्र. ८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केलेले आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचा उपक्रम; तरुण उद्योजकांसाठी प्रशिक्षण आणि मेंटॉरशिप देणार

**लातूर/प्रतिनिधी** : आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तरुणांना सक्षम उद्योजक बनविण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महामंडळ आता केवळ बँक कर्जावरील व्याज परतावा योजनांपुरते मर्यादित न राहता, लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि मेंटॉरशिप प्रदान करणार आहे, अशी माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली.

या उपक्रमांतर्गत २४ सप्टेंबर रोजी उद्योग सारथी प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले. राज्यभरातील इच्छुक लाभार्थ्यांनी यात सहभाग घेतला. पुणे कृषी विद्यालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या विषयावर मार्गदर्शन केले. हे वेबिनार यूट्यूब आणि फ ेसबुकवर लाइव्ह प्रसारित झाले.

डॉ. माने यांनी दुग्धव्यवसाय यशस्वी करण्यासाठी उत्तम जातीच्या गाई-म्हशींची निवड (गीर, साहिवाल, जर्सी), संतुलित आहार, आरोग्याची काळजी, लसीकरण, स्वच्छता, आर्थिक नियोजन, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा महत्त्वाचा घटक असल्याचे नमूद केले.

वेबिनारला युवक, महिला उद्योजिका आणि स्वयंसहाय्यता गटांचे प्रतिनिधी ऑनलाइन उपस्थित होते. लाभार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे डॉ. माने यांनी निरसन केले. वेबिनारची सविस्तर माहिती महामंडळाच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहे. पुढील काळात विविध जिल्ह्यांमध्ये तज्ज्ञांमार्फत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन होणार आहे. यामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांचे व्यवसाय वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असे मत श्री. देशमुख यांनी व्यक्त केले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



आरबीआयच्या नव्या नियमामुळे कर्ज होऊ शकते स्वस्त...

### चिमटा



दयाचा

जमिनीतून आ-वाज आल्याने नागरिक होत आहेत भयभीत ! सणाच्या काळातच निसर्ग दाखवत आहे भीती !

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी बांधील

## माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची पत्रपरिषदेत माहिती



जिल्ह्यातील शेतकयांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनासोबत लोकप्रतिनिधींनी योग्य संवाद साधून याकरिता काय-काय करणे आवश्यक आहे त्या सर्व उपाययोजना कराव्यात असे आवाहन करून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मदत मिळवून देण्यासाठी आपण कार्यशाळा आयोजित करण्यात असून यामध्ये प्रशासकीय अधिकायांसोबत विमा कंपनीच्या अधिकायांनाही सहभागी करून घेणार आहोत. या कार्यशाळेत अधिकाधिक मदत कशी मिळेल यासंबंधी चर्चा करून त्या पध्दतीने शासनाकडे अहवाल पाठविणार असल्याची माहिती देवून याच प्रकारे प्रत्येक मतदार संघात लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेवून कार्यशाळेचे आयोजन करावे असे आवाहन केले.

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यात यावर्षी विक्रमी अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीमुळे खरिपाचा हंगाम हातातून गेलेला असून शेतजमिनी खरडून गेलेल्या आहेत. पशुधन दगावल्याच्या घटना घडलेल्या असून जिल्ह्यात घरांचीही पडझड झालेली पाहण्यास मिळत आहे. विशेषत: या अतिवृष्टीने शेतकयांचे मोठे नुकसान झाले असून शेतकयांना सरकारकडून समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी आपण बांधिल असून यासाठी शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरु असल्याची माहिती माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

लातूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी निलंगा विधानसभा प्रभारी दगडू साळुंके, जि. प.चे माजी बांधकाम सभापती संजय दोरवे, बाजार समितीचे सभापती नरसिंग बिराजदार, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, मंगेश पाटील, देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरिमे आदींसह पदाधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

लातूरला यापूर्वी रेल्वेने पाणीपुरवठा करण्यात आलेला होता. याची आठवण करून देत आ. निलंगेकर म्हणाले की, दुष्काळ अनुभवलेल्या लातूर जिल्ह्याला आता जलमय परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. यावर्षी लातूर जिल्ह्यात सातत्याने मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून गेल्या दीड महिन्यात अतिवृष्टीला सामोरे जावे लागले आहे. अतिवृष्टीमुळे खरिपाचा हंगाम हातातून गेलेला असून जिल्ह्यात सर्वाधिक पेरा असलेले सोयाबीनचे पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. तसेच खरिपाची इतर पिकेही हाती लागण्याची कोणतीही शक्यता नाही. अतिवृष्टीमुळे जिवीतहानी कमी प्रमाणात झालेली असून पशुधनही दगावले गेले आहेत. पूरपरिस्थिमुळे शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. या सर्व परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी म्हणून आपण पोहोचविला असल्याची माहिती आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. नुकसान झालेल्या शेतकयांसह नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक असणारे पंचनामे १०० टक्के करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिलेले असून पंचनाम्याबाबत कोणाची काही तक्रार असेल तर त्याची दखल घेवून नुकसान झालेल्या प्रत्येकाचे पंचनामे होतीलच अशी ग्वाही आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली. अतिवृष्टीने सर्वाधिक नुकसान शेतकयांचे झाले असून शेतकयांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील मदत मिळालेली असून सप्टेंबरमध्ये झालेल्या नुकसानीची मदत लवकरात लवकर मिळावी यासाठी शासन व प्रशासन यांच्याशी संपर्क साधून आवश्यक तो पाठपुरावा सुरू आहे. जिल्ह्यातील शेतकयांना समाधानकारक म्हणजेच हेक्टरी ५० हजार रुपये मदत कशी मिळेल, यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जात असून शेतकयांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी आपण बांधिल असल्याची ग्वाही आ. निलंगेकर यांनी यावेळी दिली.अतिवृष्टीचे नुकसान ही नैसर्गिक आपत्ती असून या आपत्तीत जिल्ह्यातील शेतकयांसह नागरिकांच्या पाठीशी लोकप्रतिनिधी म्हणून सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून प्रत्येकाने खंबीरपणे उभे रहावे, अशी अपेक्षा आ. निलंगेकर यांनी यावेळी व्यक्त केली. त्याचबरोबर शेतकयांना समाधानकारक मदत मिळवून देण्यासाठी सर्वच पक्षातील लोकप्रतिनिधींनी पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर एकत्रित येवून शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच गरज पडल्यास आंदोलन करण्याची वेळ आली तरी सर्वांनी यामध्ये राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रित यावे, असे आवाहन आ. निलंगेकर यांनी केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नुकसान झाले, आता पुढे काय ?

महाराष्ट्रात पावसाने मोठे नुकसान झाले आहे. सर्वाधिक नुकसान हे राज्यातील ग्रामीण भागात झाले आहे. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे त्याच प्रमाणे घराचे काय सर्वच बांधकाम हे कच्चे असते. मजबुत नसते हे मान्यच केले पाहिजे. एकतर शास्त्रशुद्ध बांधकाम नसते. त्यामुळे पावसाने अनेक घराची पडझड झाली आहे. शाळा, आरोग्य सुविधा देणारे केंद्र, गावातील रस्ते, गावास जोडणारा रस्ता व त्यावरील पुल आदिचे नुकसान झाले आहे. केवळ शेतीचे नुकसान झाले नाही तर इतरही बाबीचे नुकसान झाले. जनावरांचे मोठे नुकसान झाल्याने कोठे राज्यात दुधाचा तुटवडा पडतो की काय असे वाटायाला लागले आहे. ग्रामीण भागातील शाळा सुद्धा बंद दिसून येतात. गेल्या दहा दिवसापासून विद्यार्थी शाळेत जात नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे सर्वच जनजीवन या पावसाने विस्कळीत केले आहे. पावसाने सर्वाधिक नुकसान हे शेतकऱ्याचे झाले आहे. आज शेतीत केवळ चिखल दिसून येत आहे तर काही ठिकाणी जमीनीवरील मातीच वाहुन गेल्याने दगड-गोटे उरले आहेत. ही वस्तूस्थिती आहे. सरकार म्हणते पंचनामे करणार, पंचनाम्यात चुका करू नका, अचुक करा. किती दिवस पंचनामे चालणार? त्यात पंचनाम्यात गडबड नको असेही म्हणाणारे काहीजन आहेत. मदत मिळण्यासाठी जे काही नियमावली असेल त्यानुसार मदत दिली पाहिजे. काहीजन आपल्यापरीने जीवनाश्यक वस्तूचे वाटप करीत आहेत. ही एक चांगली बाब आहे. काही स्वत:च्या हिंमतीवर मदत करणारे आहेत. वास्तविक सरकारची मदत ही सरसकट असते. जनतेचा विश्वास हा सरकारच्या मदतीवर आहे. त्यामुळे सरकारने आपआपल्यापरीने तातडीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. आता काही ठिकाणी पावसाने विश्रांती घेतली आहे. निसर्ग कधी काय करेल याचा भरोसा नसतो. त्यामुळे सतर्कता बाळगावी लागते. निसर्ग कोपला तर काय होवू शकते, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे निसर्गाच्या नादाला न लागता, त्याचा ऱ्हास न होऊ देता चालले पाहिजे. पावसाने केवळ महाराष्ट्रात काय देशात धुमाकुल घातला आहे. का घातला व त्यामागील कारणे मोठी आहेत. वरचेवर निसर्गाच्या विरोधात काम होताना दिसून येत आहे. अनेक दिवसापासून निसर्ग नियमात बदल दिसून येत होता, त्यावेळेपासून सावध झाले पाहिजे होते. आलिकडे ऋतूमानात मोठा बदल दिसून येतो. उन्हाळ्यात मोठा पाऊस पडत नाही. उन्हाळ्यात उन्हच असते. यावेळी मात्र उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता. प्रत्येक बाबीचा विचार केला तर अनेक बाबी कळून येतील, चुकाही लक्षात येतील. एकतर झाडाचे महत्व कळाले नाही. झाड किती मौल्यवान आहे हे समजले नाही. त्यापासून मोफत मिळणारे फायदे लक्षात आले नाहीत. आपण तरी झाडे लावत नाहीत, लावले तर नावालाच! आपल्या पुर्वजांनी लावलेले झाडे विकून खाल्ली. मोठ-मोठी झाडे अनेक वर्षाची होती ती दिसून येत नाहीत. एक गाव असेही नव्हते की जेथे घनदाट झाडी नव्हती. प्रत्येक गावात घरोघरी, रस्त्यावर झाडे दिसून येत होती. ती लोप पावली. सर्वत्र काँक्रीटची जंगले दिसून येत आहेत. पाणी जमीनीत पुरते, ज्यावेळी झाडांच्या मुळा लांब असतात. त्याच्यात पाणी शोषून घेण्याची क्षमता असते. जमीन घट्ट धरून ठेवते. डोंगरावरील झाडे हे दरडी कोसळू देत नाहीत. झाडाची मुळ ही मातीला घट्ट धरून ठेवते. मोफत ऑक्सीजन देते. भरपूर प्रमाणात ऑक्सीजन देणाऱ्या काही वनस्पती आहेत. आज जे विविध रोग दिसून येतात याला कारण निसर्गाचा ऱ्हासामुळे दिसून येतात. सांगायाचे कारण पाऊस जे मोठ्या प्रमाणात झाले याला कारण निसर्गाचा परिणाम आहे. काही तरी मानवाच्या हातून चुक झाल्याचा परिणाम आहे. राज्यात अचानक पाऊस झाला, किती वेळ पडला तर एक-दोन दिवस पडत होता, या पावसाने किती नुकसान केले. एकतर राज्यातील नदी, बंधारे, साठवण तलाव भरून वाहु लागले. अधिक पाणी सोडून द्यावे लागले. हे पाणी कोणाचे तरी नुकसान करणारे ठरले आहे. त्यामुळे पावसाने अधिक नुकसान शेतीचे झाले, कारण शेती ही ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय असणारी बाब आहे. ग्रामीण भागात दुसरा विकास झाला नाही. ग्रामीण भागात पर्याय दिला नाही किंवा दिसून येत नाही. ग्रामीण भागातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती व जनावरे पाळणे हा आहे त्यामुळे याच मुख्य व्यवसायावर संकट आले आहे. त्यामुळे पहिल्यांदा शेतकऱ्यास मदत केली पाहिजे. दुसरे ज्यांच्याकडील जनावरे मरण पावली आहेत त्यांना मदत करावी लागणार आहे. ज्यांच्याकडे जनावरे आहेत, त्यांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवावा लागणार आहे. ही कामे प्राधान्याने करणे अपेक्षित आहेत. सर्वांत महत्वाचे म्हणजे बऱ्याच भागात पाऊस थांबला आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी आता घरात न थांबता पाण्याचा निचरा कसा होईल या बाबत नियोजन करावे. सरकार मदत करणार आहे असे सांगत आहे. केंव्हा करणार किंवा खात्यात जमा केंव्हा होणार या बाबत फिक्स अशी तारीख निश्चित दिसून नाही. त्यामुळे राणातील पाणी कमी झाले पाहिजे. आता शेतातील उभे पीक जसे सोयाबिन हाती लागेल असे वाटत नाही. शेतीच जवळपास नष्ट झाली आहे. वास्तविक पुर्वीचा अनुभव पहाता संकटावर मात करण्यात पुढे आले पाहिजे. काही झाले तरी पुन्हा उभारी घेणे कठिण आहे. तरी मुख्य व्यवसाय शेती आहे ती तर सोडता येत नाही. त्यामुळे मन खचून न जाता पुन्हा जोमाने कामाला लागावे लागेल. तसे पाहिले तर कठिण बाब आहे. रब्बीसाठी राण तयार करणे अशक्य वाटते. रब्बीसाठी पेरणी शक्य वाटत नाही. रोटर करून घेणे व आहे तशा स्थितीत पेरणी आवश्यक आहे. या बाबत कृषी विभाग किंवा कृषी तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा लागणार आहे. अशा पाणीग्रस्त स्थितीत काय करता येईल. कसे पिक घेता येईल याचा विचार करून राणात पेरणी करणे योग्य ठरणारे आहे. नुकसान तर मोठया प्रमाणात झाले आहे यावर मात कशा प्रकारे करता येईल याचा विचार करून वाटचाल करणे आवश्यक आहे.

# नवी दिल्लीत महापारेषणला पॉवर ट्रान्समिशन पुरस्कार प्रदान

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी केले अभिनंदन

नवी दिल्ली : येथील डन ॲन्ड ब्रॅडस्ट्रीट या संस्थेच्या वतीने दिला जाणारा पॉवर ट्रान्समिशन (स्टेट पीएसयू) पुरस्कार यंदा महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला (महापारेषण) मिळाला. केंद्रीय वित्त विभागाचे सहसचिव श्री. नवीन अग्रवाल यांच्या हस्ते महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. किशोर गरूड व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकाबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

नवी दिल्लीतील हॉटेल ताज मानसिंगमध्ये १७ व्या पीएसयू आणि शासन परिषदेत हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी केंद्रीय ग्रामीण विकास विभागाचे सहसचिव श्री. कुणाल सत्यार्थी उपस्थित होते.



नवी दिल्ली : येथील डन ॲन्ड ब्रॅडस्ट्रीट या संस्थेच्या वतीने दिला जाणारा पॉवर ट्रान्समिशन (स्टेट पीएसयू) पुरस्कार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला (महापारेषण) मिळाला. केंद्रीय वित्त विभागाचे सहसचिव श्री. नवीन अग्रवाल यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. किशोर गरूड व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे

महापारेषण ही देशातील सर्वात मोठी पारेषण कंपनी आहे. अति उच्चदाब वाहिन्यांचे जाळे सर्वदूर आहे. महाराष्ट्र राज्याची ३० हजार मेगावॉटपेक्षा अधिक विजेची मागणी महापारेषणने यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महापारेषणने वीजक्षेत्रात नवा उच्चांक गाठला आहे. विशेषतः दुर्गम, डोंगराळ भागात ड्रोनच्या सहाय्याने कामे केली जात आहेत. तसेच हाय परफॉर्मेस कंडक्टर बसविण्यात आले आहेत. ग्रिड स्टॅबिलिटी मेंटेन करण्यासाठी धुळे व लोणीकंद (पुणे) येथे स्टॅटकॉम प्रकल्प प्रस्तावित आहेत. टी.बी.सी.बी.च्या माध्यमातून प्रकल्पांकरिता खुला सहभाग महापारेषणने ठेवला आहे.

**तंत्रज्ञानामुळे महापारेषणची प्रगती : डॉ. संजीव कुमार**

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली महापारेषणमध्ये विविध प्रकल्प व संचलन चांगल्या पध्दतीने व वेगाने होत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यकुशलता वाढली आहे. भविष्यातही, अधिकारी व कर्मचारी नावीन्यपूर्ण काम करून महापारेषणचे नाव नक्कीच उंचावतील, असे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी सांगितले.

# पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**टंचाईच्या सर्व सवलती मिळणार, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याला प्राधान्य**

**आपत्तीग्रस्तांकडून वसुली नको; बँकाना निर्देश**



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली असून नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत ( मॅन्युअल) अशी व्याख्येचा समावेश नाही. असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त लातूरात आरोग्य तपासणी शिबीर

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून १ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६:३० ते ८:३० या वेळेत लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलात सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय आणि लातूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक कार्यकारी समितीचे शासकीय सदस्य बी. आर. पाटील, जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर. बी. जोशी, सचिव प्रकाश घादगिने यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. लातूर जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराला उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड आणि महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ लातूर शाखा यांनी केले आहे.

# महावितरणमध्ये सन्मान सौदामिनींचा कार्यक्रम उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** स्त्री शक्तीला समर्पित नवरात्र उत्सवानिमित्त सन्मान सौदामिनींचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन महावितरणच्या लातूर परिमंडळाच्या वतीने काल (दि.२९) मोठ्या उत्सहात करण्यात आले होते. या कार्यक्रमातून महावितरणमध्ये कार्यरत महिला अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

विद्युत भवन येथे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले , सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं) चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, कार्यकारी अभियंता अरविंद घाटगे यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडलेल्या सन्मान सौदामिनींचा या कार्यक्रमासाठी प्रमूख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. प्रणिता चाकूरकर यांनी स्त्रीयांचे आरोग्य व सामाजिक स्वास्थ्य या विषयावर उपस्थित महिला अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या धकाधकीच्या व सोशल मेडियाच्या जीवनात महिलावर्ग स्वतः च्या आरोग्याकडे जाणूनबूजून दुर्लक्ष्य करीत आहे. अनावश्यक अशा गोष्टीमध्ये वेळ खर्ची जात असल्यामुळे आपण ना कुटूंबाचे स्वास्थ्य जपत आहोत ना आपल्या मुलांबाळांकडे निटसे लक्ष देत आहोत. नौकरीतला तणाव व कुटूबावरील प्रेम यामध्ये तणावच आपल्या जीवनावर परिणाम कारक पणे वरचढ ठरताना दिसत आहे. परिणामी चिडचिड होणे, मुलांना नीट समजावून घेणे असे प्रकार घडत आहेत. त्यामुळे महीला कर्मचाऱ्यांनी तणाव मूक्त राहूण काम करावे व कुटूंबासोबतच सामादिक स्वस्थ्य अबाधीत ठेवावे असे विचार व्यक्त केले. सुरवातीला मुख्य अभीयंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

कुटूंबाचा व कार्यलयीन कामकाजाचा भार सांभाळत अनेक अधिकारी कर्मचारी महिलांनी ज्या प्रकारे कठीण प्रसंगांना तोंड देत यशस्वी कारकीर्द घडवली, ते उपस्थितांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले. या उपक्रमामुळे महिलांच्या कार्याबद्दल असलेली कृतज्ञता व्यक्त होत एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असल्याचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक (मासं) श्री अजीत जैन यांनी केले.

# नवरात्रीच्या समाप्तीचा दिवस

: विजयादशमी : दसरा :

दरवर्षी नवरात्र हे नऊदिवस आणि नऊ रात्री नंतर दहाव्या दिवशी संपते पण यंदा हे दहा दिवस पूर्ण झाल्यावर अकराव्या दिवशी समाप्त होते आहे. नवरात्रीचे नऊदिवस ,नऊरात्री खूपच धामधूमीचे गेले. नऊदेवींच्या नऊ सुरेख रूपांचे दर्शन झाले.आजच्या दिवशी नवरात्रीची पुरण, गोडधोड करुन देवाला नैवेद्य दाखवुन , घट, दिवा हलवुन सांगता केली जाते.काही ठिकाणी आदल्या दिवशीसुद्धा समाप्ती होते.




दहावा दिवस म्हणजेच दसरा ! यालाच दशहरा, विजयादशमी असेही म्हणतात . हा भारतीय हिंदूंच्या सणांपैकी खूप मोठा आणि महत्वाचा सण ,उत्सव मानला जातो.नवरात्रीच्या नऊरात्र ,नऊदिवस अविरत युद्ध करून दहाव्या दिवशी दुर्गा देवीने महिशासूर , रक्तबीज ,शुंभ , निशुंभ अशा क्रूर , उन्मत्त राक्षसांचा नाश करून विजय संपादन केला आणि तिन्हीलोकांना त्यांच्या त्रासातुन मुक्त केले म्हणून हा विजयाचा मोठ्ठा दिवस विजयादशमी म्हणून धुमधडक्यात साजरा करतात . हा मानाचा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. यादिवशी सर्व शुभ कार्यांची सुरुवात केली जाते.नवीन लहान मोठ्ठया सर्व वस्तूंची,वाहनांची,घराची खरेदी केली जाते. आपट्याची पाने, झेंडूच्या फुलांनी बाजार नुसता फुलतो. घरे, दुकाने,वाहने, यांची झेंडूचे हार, माळा यांनी सजावट केली जाते.पुरण, गोडधोड, मिठाया बनवून खाल्या जातात.सर्व आप्तेष्ट एकमेकाना भेटून हा सणं खूप आनंदाने साजरा करतात.

तीन रात्री सरस्वती निद्रा करते आणि दसऱ्याला ती जागी होते असे मानून तिचे प्रतिक म्हणजे पाटी,पुस्तके,वह्या यांची विद्यार्थी पूजा करतात.


आजच्या दिवशी अश्मंतक म्हणजेच आपट्याच्या पानांना सोने समजून विजयादशमी या सणाचे महत्व प्रत्येक प्रांतात, राज्यात खूप वेगवेगळे आहे त्यामुळे तो साजरा करण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या आहेत. हे दहा दिवस बऱ्याच राज्यात रामाने रावणावर केलेल्या विजयाचे स्मरण म्हणुन साजरे करतात. काही भागात रामकथेतील कथा वर आधारीत विविध नाटके सादर करतात त्यांना रामलीला म्हणतात. शेवटच्या दहाव्या दसऱ्याच्या दिवशी गावातील सर्वांत मोठ्या मैदानामध्ये पुठ्ठे, लाकडे, कापड यांनी खूप मोठ्ठा भव्य दहा तोंडे असलेल्या रावणाचा पुतळा बनवून त्यात भरपूर फटाके ,शोभेची दारू भरून उभा करतात. मग रामलीलेतील रामाचा अवतार घेतलेला माणूस त्या रावणाला धनुष्यातून अग्निबाण सोडून मारतो आणि रावणाला ठार मारतो ,त्याचे दहन करतो . हा खूप मोठा आणि सुरेख सोहळा असतो आणि तो पाहण्यासाठी गावोगावचे असंख्य लोक येतात. सर्व दुष्ट शक्तींचा नायनाट होऊन या दिवशी आनंदाचे, संपन्नतेचे, शांततेचे रामराज्य सुरु होते असे मानले जाते. हे रावणदहन वाईटाचा नाश असल्याचे प्रतीक मानले जाते.

हा दिवस रामायण आणि महाभारत दोन्ही काळात घडलेल्या चांगल्या दिवसाची आठवण म्हणूनच साजरा होतो.या दिवशी रामाने रावणाचा नाश करून विजय मिळवला होता तर पांडवांनी त्यांचा वनवास आणि अज्ञातवास यशस्वीरित्या पार पाडून या दिवशी शमीच्या झाडावर लपवून ठेवलेली सर्व शस्त्रे काढून त्यांची पूजा केली आणि त्यांचे राज्य परत मिळवले म्हणून या दिवशी शस्त्रांची पूजा करतात. त्याची आठवण म्हणुन या दिवशी पुरुष नवीन कपडे घालून, डोक्यावरील शिरपेचात ..टोपी कींवा फेट्यात नवरात्रातील घटामध्ये उगवलेले धान्य मोठ्या दिमाखात खोचून गावाचे सीमोल्लंघन करतात आणि घरी येताना आपट्याची पाने तेजाचे, विजयाचे प्रतिक आहे म्हणून सोनेच मानून घरी आणतात. दारात त्यांचे पाय धुवून, औक्षण करून सुवासिनी त्यांना सन्मानाने स्वागत करतात. मग ही आपट्यांची पाने सोने मानून एकमेकांना आनंदाने देतात.

आपट्यांच्या पानांना सोने का समजतात याबद्दल एक पौरणिक कथा आहे.

रघुराजाने सर्वस्वदक्षिणा यज्ञ केला. या यज्ञा नंतर आपल्याजवळील सर्व संपत्ती लोकांना दान करून टाकायची असते,तसे त्याने केले. त्यानंतर त्याच्याकडे कौत्स मुनी त्यांच्या यज्ञासाठी दान मागण्यासाठी रघुराजाकडे आले. त्यांनी चौदा सहस्त्र मुद्रांची मागणी केली. रघुराजाने तर सर्व कोषागार रिकामे केले होते. पण धर्माने राज्य करणाऱ्या राजाला ब्राह्मणाला तसेंच

विन्मुख पाठवणे पटणारे नव्हते. त्याने देवांचा खजिनदार कुबेर याच्यावर आक्रमण करण्याचे निश्चित केले. कुबेर खूप घाबरलाआणि त्यानेअमाप धनसंपत्ती राज्याच्या वेशीबाहेरील आपट्याच्या झाडाखाली आणून ठेवली.रघुराजाने ती सगळी संपत्ती कौत्समुनीना देऊ केली, पण त्यांनी फक्त चौदा सहस्त्र मोहराच घेतल्या. मग ब्राह्मणासाठी दिलेल्या संपत्तीवर आपला काय अधिकार आहे,असे म्हणून त्याने सर्व प्रजेला त्यांना हवी तेवढी संपत्ती घेऊन जाण्यास सांगितले.तेंव्हा सारी प्रजा तिथे आली आणि आनंदाने संपत्ती घेतली. या साऱ्याचा साक्षीदार हे आपट्याचे झाड होते. त्याची आठवण म्हणून दसऱ्याला त्या झाडाची पूजा करण्याची प्रथा पडली.



मग संपत्ती,सोने म्हणून याच्या पानाला मान,महत्व दिले आणि म्हणूनच या मंगल दिवशी लोक एकत्र भेटुन आनंदाने ते एकमेकाना देतात.यामुळे आदानप्रदान शीलता वाढते. उत्साह वाढतो. त्यानिमित्ताने का होईना लोक आपट्याची

झाडे लावून त्याचे संवर्धन करतील, अशी त्यामागे भावना आहे.

पण दुर्दैवाने लोक ती भावना समजून न घेता त्यासाठी त्यादिवशी ती झाडेच अक्षरशः तोडतात.कित्येकाना तरी खरे आपट्याचे झाड,पान ठाऊकही नसते, विशेषतः शहरात! मग आपट्याची म्हणून त्याच्यासारख्या दिसणाऱ्या पानांची झाडे सुद्धा ओरबाडली जातात. आणि हे नकली सोने एकमेकाना केवळ प्रथा म्हणून देतात.याचा खरंच खेद वाटतो. त्यापेक्षा प्रत्येक चांगल्या प्रसंगांची, सण,उत्सव किंवा वाढदिवसासारखे कार्यक्रम असले की त्याची छान आठवण म्हणून किमान एकतरी झाड लावून ते वाढवावे किंवा जो पैसा छोट्या,मोठ्या एव्हेन्ट मध्ये विनाकारण केवळ आपल्या आनंदासाठी, डामडौल म्हणून खर्च करतो,तोच पैसा अनाथ,अपंग,गरजू व्यक्तींना दिला तर तो आनंद त्याही पेक्षा मोठा असतो हे लक्षात येईल.एका माणसाच्या आनंदात कित्तीतरी गरजूंच्या आयुष्यात आनंद देऊन तो डोळ्यांनी पाहण्याचे सुख तर आपल्याला मिळेलच,पण त्यांचे आशीर्वाद, सदिच्छाही मिळतील. समाजसेवेचे पुण्यही लाभेल. असा जर दसरा साजरा केला तर खऱ्या अर्थाने अभिमानाने म्हणता येईल, ''दसरा सणं मोठा ,नाही आनंदा तोटा.''

**सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे.**

# आयुर्वेद



ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे किंवा ज्या शास्त्राच्या उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते ते शास्त्र म्हणजे आयुर्वेद. प्राथमिक स्वरूपाचा आयुर्वेद लिखित स्वरूपात अथर्ववेदात प्रथम दिसतो. चरकसंहिता, सुश्रुतसंहिता व काश्यपसंहिता यांच्यामध्ये त्याला शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालेले दिसते. नंतर रसतंत्राची त्यात महत्त्वाची भर पडली. मानवी शरीराचा व सृष्टीचा संपूर्ण अभ्यास करून आयुर्वेद हा शास्त्रपद-वीस अतिप्राचीन काळी पोचला. त्यात मानवी जीवन व सृष्टी यांच्या क्रियाप्रतिक्रियांचे मौलिक तत्त्वचिंतन ग्रथित केलेले आहे. तत्त्वज्ञान हा त्याचा पाया आहे व उच्च सुसंस्कृत मानवी जीवन त्याचा आदर्श आहे. सांख्य, योग, न्याय व वैशेषिक ही दर्शने त्यातून विकास पावली. आयुर्वेद हा धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांचे अधिष्ठान आहे, असे आयुर्वेदात म्हटले आहे.

हेतू, लिंग व औषध म्हणजे उपाय हे आयुर्वेदाचे तीन मुख्य विषय. आरोग्याची म्हणजे हितकर आयुष्याची व रोगाची कारणे म्हणजे हेतू आरोग्याची व रोगाची लक्षणे वा चिन्हे म्हणजे लिंग आणि आरोग्याची व रोगनाश करण्याची साधने म्हणजे औषध वा उपाय. निरोगी व हितकर आयुष्याच्या अध्ययनात तर सर्व सृष्टीचे अध्ययन अंतर्भूत होते. कारण पांचभौतिक सृष्टीतून मनुष्यशरीर उत्पन्न होते, त्यातच राहते व त्यातच मरते त्याचा जन्म, स्थिती व मरणरूप संसार विश्वाचाच भाग आहे हेतुविषयक विचारात जिवंत मानवशरीर व ते शरीर ज्या सृष्टीचे कार्य आहे त्या सृष्टीचा विचार अंतर्भूत होतो. कारण मानवी जीवनाची परिपोषक व रोगप्रतिकारक साधने व प्रतिकूल कारणे सृष्टीतच असतात व मानवी जीवनाच्या क्रियाप्रतिक्रिया त्यावर अवलंबून असतात. या संदर्भातच करून घ्यावयाचे हितकर व रोगप्रतिकारक आयुष्य व दुर्बल आणि रोगी आयुष्य यांचे विज्ञान म्हणजे आयुर्वेद इसवी सनापूर्वी हा वेद निर्माण झाला.हितकर आयुष्य : जो शारीरिक व मानसिक रोगांपासून मुक्त, विशेषतः तारुण्य चिरकाल असणारा, यश, बल, वीर्य व पराक्रम यांनी युक्त असा, इंद्रियांचे अर्थ, उपभोग संभार ज्याला उप-लब्ध होऊ शकतात, ज्याची इंद्रिये विषयांचा उपभोग घेण्यास समर्थ आहेत, ज्याला अनेक विषयांचे पुष्कळ ज्ञान आहे, जो एक महान विद्वान वा कलाकार आहे, सामर्थ्यशाली व मोठे व्यक्तित्त्व ज्यास लाभले आहे व समाजात तसा जो मानला जातो, ज्याला श्रेष्ठ दर्जाचे वैभवप्राप्त झालेले आहे, कोणतेही कार्य करण्याच्या प्रारंभीच त्या कार्याच्या सिद्धीची सामग्रीही ज्याला संपादन करता येते व जो इच्छेप्रमाणे वागू शकतो त्याचे आयुष्य हितकर व सुखी होय. याच्या विरुद्ध ज्या प्रमाणात ज्याची परिस्थिती असते त्या प्रमाणात त्याचे आयुष्य दुःखी असते. सर्व प्राणिमात्रांचे हित करणारा, दुसर्‍याचे न घेणारा, सत्य बोलणारा, मनोजयी, करावयाचे ते विचारपूर्वक करणारा, गाफिल किंवा बेफिकीर न राहणारा, धर्म, अर्थ, काम यांचे संपादन व सेवन हे परस्परांना अविरोधीपणाने करणारा, पूज्यांची पूजा करणारा, शांत स्वभावाचा, वृद्धांना मान देण-ारा, प्रेम, क्रोध, मत्सर, गर्व, गौरव व गती यांवर व्यवस्थित नियंत्रण करणारा, नेहमी नाना प्रकारे दान करणारा, लोकांना नाना प्रकारची मदत करणारा, तपा-चरणाने ज्ञान संपादनाचा व इंद्रियजयाचा नेहमी प्रयत्न करणारा, अध्यात्म जाणणारा व त्यात रत होणारा, स्मृती व बुद्धी चांगली असणारा, इह व परलोक यांचा विचार करणारा, याचे आयुष्य हितकर होय. आयुर्मान: साधारणपणे माणसाचे १०० वर्षे हे आयुर्मान होय. शरीरावयाच्या लांबी रुंदी, हालचालीने दिसणारे दृश्य, गूढता, उन्नतता, अवयवरचना, शरीरवाढीचा क्रम, अंगुलींचे प्रमाण, सारासारत्व, प्रकृतिदोष इ. अनेक गोष्टींवरून आयुष्याच्या दीर्घादीर्घत्वाचे प्रमाण आयुर्वेदात सांगितले आहे. हात, पाय, पाठ, दात इ. मोठी असणे, हाताची बोटे व उच्छ्वास लांब असणे, उरःस्थल विस्तृत व स्तनांतील अंतर विस्तीर्ण असणे, जांघ, मान व शिस्न लहान असणे, लांब, दाट व मऊ केस असणे, पुष्ट व मोठे कान असणे, सांधे मांसादिकांनी झाकलेले असणे इ. अनेक गोष्टींवरून दीर्घायुष्य समजता येते. याच्या उलट लक्षणे असणे म्हणजे लहान बोटे, लहान पेरी, दीर्घ शिस्न, छाती आकुंचित असणे इ. अल्पायुष्याची दर्शक होत. हसताना, बोलताना हिरड्या अगदी उघड्या दिसणे, स्वाभाविक जागेपेक्षा वर कान असणे इ. लक्षणे अल्पायुष्याची होत. मध्यम आयुष्याची लक्षणेही सांगितली आहेत. जो निरोगी असतो आणि गर्भावस्थेपासून हळूहळू वाढतो तो दीर्घायू असतो. शरीरघटकांच्या वाढीवरूनही आयुष्याचे प्रमाण सांगितले आहे. शरीरघटक जर एकदम वाढले, तर ते अल्पायुष्याचे दर्शक होत. ज्या त्या व्यक्तीच्या स्वतःच्या अंगुलांनी अवयवाची मापे शास्त्रकारांनी सांगितली आहेत, त्या प्रमाणाची ती अंगप्रत्यंगे असली की, ते दीर्घायुत्वाचे लक्षण समजले जाते. धातूंच्या उत्तम सारत्वामुळे दीर्घायुष्य, मध्यम सारत्वामुळे मध्यायुष्य आणि असारत्वामुळे अल्पायुष्य समजावे. शरीराची दोष प्रकृती आयुष्याचे प्रमाण ठरविण्याला उपयुक्त होते.

# सहकार्य

कथा : प्रा. देवबा पाटील

आदित्यने आधीपासूनच सुभाषला काहीतरी मदत करण्याचा आपल्या मनाशी ठाम निश्चय केलेला होताच. एके दिवशी आदित्य सुभाषला म्हणाला, तुझ्या गावात भाजीपाला पिकतो असे तू मागे सांगितले होते. भाजीपाला विकत घेण्यासाठी मी तुला दररोज १०० रु. एक महिन्यांपर्यंत असे देत जातो. माझ्या घरचा मोठा सच्छिद्र हारा व सायकलही तुला देतो. दररोज सकाळीच तू तुझ्या गावच्या शेतकर्‍याजवळून भाजीपाला विकत घ्यायचा. तो स्वच्छ पाण्याने धुवायचा. स्वच्छ कापडाने पुसून कोरडा करायचा. हार्‍यामध्ये भाजीपाला नीट रचून ठेवायचा. बारीक छिद्रांतून हवा लागल्यामुळे भाजीपाला खराब होणार नाही. भाजीपाल्याचा हारा सायकलच्या कॅरिअरवर ठेवायचा व दोरीने नीट बांधून घ्यायचा. सायकलने येथे तो भाजीपाला आणायचा. येथील शेजार्‍यांना तो भाजीपाला विकून त्यावर जो नफा राहील तो तू घ्यायचा. नंतर शाळेत जायचे. ठीक आहे? सुभाषने आनंदाने होकारार्थी मान डोलावली. आता पुढचे ऐक. तुला रोजचा जो नफा राहील तो तू बाजूला काढून ठेवायचा. जसजसे तुझे गिर्‍हाईक वाढत जातील तसतसा तुला तुझ्या ह्या बचतीचा पैसा कामात पडत जाईल. एक महिन्यानंतर तुला दररोजचे १०० रु. देणे थांबवू. अर्थात ही सायकल तुला कायमची दिली, ती आता तुझीच झाली असेच तू समज. हारासुद्धा तू कायमचा वापरायचा. तो खराब झाल्यानंतर पुढे तुझ्या कमाईतून नवीन चांगला हारा विकत घ्यायचा. असा पुढे तुला तुझा हा छोटासा व्यवसाय तुझ्या हिंमतीवर, कमाईवर व बचतीवर चालवावा व वाढवावाही लागेल व शिक्षणही करावे लागेल. 'हो.' सुभाष म्हणाला. एवढेच नाही, आदित्य पुढे म्हणाला, तर अभ्याससुद्धा चांगला मनापासून करावा लागेल. परीक्षेत चांगले मार्क्सही मिळवावे लागतील. 'होय दादा.' सुभाष बोलला. सुभाष घरी गेला. रात्री त्याने आपला अभ्यास पूर्ण करून घेतला. दुसर्‍या दिवसापासून सुभाषची दररोजची दिनचर्या सुरू झाली. तो दुसर्‍या दिवशी सकाळी लवकर उठला. पटकन आपली आंघोळ उरकली. कशीबशी आपली भाकरी टाकली नि तीवर चटणी टाकून ती एका फडक्यात बांधली. नंतर तो ताबडतोब त्याच्या गावच्या शेतकर्‍यांच्या भाजीपाल्याच्या गाड्या जेथून शहरामध्ये भाजीपाला विकण्यासाठी जातात तेथे गेला. त्याने त्यांना सगळी हकिकत सांगितली. ते ऐकून प्रत्येकाने आपापल्या जवळील भाजीपाला त्याला अगदी रास्त भावात दिला. त्याने प्रत्येक शेतकर्‍याला ताबडतोब ज्याचे त्याचे पैसे दिलेत. घरी नेऊन त्याने भाजीपाला स्वच्छ पाण्याने धुतला. स्वच्छ कापडाने कोरडा केला. हार्‍यात नीट रचून ठेवला. हारा सायकलच्या कॅरिअरवर दोरीने नीट पक्का बांधला. आपले दप्तर व भाकर घेतली नि सायकलवर टांग टाकली व अवंतीपूरकडे निघाला. थोड्याच वेळात सुभाष आदित्यच्या घरी पोहोचला. आदित्य स्वतः त्याच्यासोबत बाहेर आला व त्याच्या सायकलसोबत चालू लागला. आदित्यने त्याची सार्‍या शेजार्‍यांशी ओळख करून दिली. त्याच्याजवळ कसा चांगला ताजा ताजा भाजीपाला असतो हेही त्या प्रत्येक शेजार्‍याला सांगितले. आदित्यने सांगितल्यामुळे सार्‍या शेजार्‍यांनी त्याचा भाजीपाला विकत घेतला. शाळा सुरू होण्याचा वेळ हाईपर्यंत त्याचा सारा भाजीपाला बरोबर विकून संपला. त्यामुळे तो सरळ सरळ शाळेत गेला. शाळेत गेल्यावर त्याने आपली सायकल कुलूप लावून सुरक्षित ठेवली. आदित्य आता दररोज संध्याकाळी शाळा सुटल्यावर एक तास नियमितपणे त्याचा अभ्यासही घेऊ लागला. सुभाष जसा अभ्यासात हुशार होता तसाच व्यवहारातसुद्धा होता. एका महिन्यातच त्याने आदित्यचे उसने घेतलेले पैसे फेडलेत व तो स्वावलंबी झाला. त्याची उन्नती पाहून आदित्यही खूश झाला.

# बेजबाबदार मानसिकता



बेछूट आरोप करत स्वतःचा बचाव करणे, ही राजकारण्यांची खासियत 'थलपती'कडे आधीच असल्याचे दिसते. दुर्घटनेमागे द्रमुक असल्याचा सनसनाटी आरोप त्याने केला आहे.

एखाद्या गंभीर दुर्घटनेतून धडा शिकण्याची इच्छा आणि मानसिकता नसेल, तर त्या प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळता येणे कठीण. त्यामुळे तामिळनाडूतील चेंगराचेंगरीत अनेक बळी जाणे दुःखदायक असले तरी ही मालिका थांबणारी नाही. याचा दोष सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेएवढाच नागरिकांकडेही जातो. अभिनेते विजय थलपती यांचा राजकीय मेळावा अनेक कुटुंबांसाठी कायमचा आघात ठरला. ४० जणांचे बळी गेले, शेकडो जण जखमी झाले. तामिळनाडूत करूरमध्ये ही भीषण घटना घडली. जोसेफ विजय चंद्रशेखर, म्हणजेच विजय थलपती हा दक्षिणेतील लोकप्रिय अभिनेता. त्याचे अनेक दाक्षिणात्य चित्रपट डब होऊन हिंदीतही आले. चाकोरीबद्ध स्टंटपट, यापलीकडे त्याच्या चित्रपटांचे वर्णन होऊ शकणार नाही; पण समाज 'नायका'च्या शोधात असतो. पडद्यावर अपप्रवृत्तीला आव्हान देणार्‍या थल-पती विजयची जादू तामिळनाडूमध्ये नसती तरच नवल! आता त्याने राजकीय रणांगणावर पदार्पण करत 'तमिळगा वेत्री कळघम' अर्थात टीव्हीके हा राजकीय पक्ष स्थापन केला आहे. पक्ष लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे मेळावे सुरू आहेत. दक्षिण भारतीय मानसिकतेत राजकीय नेत्यांचे दैवतीकरण ही नवी बाब नाही. आपल्या लाडक्या अभिनेत्याला पाहण्यासाठी जनसागर उसळला. कार्यक्रमाची जी वेळ जाहीर केली जाते त्यावेळी कार्यक्रम सुरू करण्याची आपली संस्कृती आणि परंपरा नाही. आपले महत्त्व वाढविण्यासाठी कलाकारांनी नियोजित वेळ उलटून गेल्यावर अनेक तासांनी येणे, ही रुळलेली पद्धत. अभिनेता विजय देखील अनेक तासांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचला. सकाळपासून उन्हात थांबून त्याला पाहण्याची प्रतीक्षा करत असलेल्यांमध्ये गोंधळ उडणे स्वाभाविक होते. त्याचे भाषण सुरू असताना अनेकांनी व्यासपीठाकडे धाव घेतली. तीस हजार नागरिक उपस्थित राहतील असा अंदाज होता. प्रत्यक्षात मेळाव्यास उपस्थित असलेल्यांची संख्या त्याहून दुप्पट होती. तामिळनाडू सरकारने या दुर्घटनेच्या चौकशीसाठी समिती नेमली आहे.

मदतीचा सोपस्कार

मरण पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. विजय यानेही स्वतःकडून मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांना वीस लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. आयपीएल टी -२० क्रिकेट स्पर्धेतील विजयानंतर बंगळुरु रॉयल चॅलेंजर्सने बंगळुरुत विजयोत्सव साजरा केला. तेथे चेंगराचेंगरी झाली आणि मृत्यूचे तांडव घडले. त्या घटनेला चार महिने पूर्ण होत नाहीत तोच तामिळनाडूत त्याचप्रकारच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती झाली. चिन्नास्वामी स्टेडियममधील दुर्घटनेनंतर उत्तराखंडमध्ये हरिद्वारमधील मनसा देवीच्या दर्शनावेळी चेंगराचेंगरी होऊन काही भाविकांचा मृत्यू झाला. मंदिराच्या पायर्‍यांवर विजेचा प्रवाह पसरल्याची अफवा चेंगराचेंगरीला कारणीभूत ठरली होती. उत्तरप्रदेशात कुंभमेळ्यात लाखोंच्या संख्येने भाविक आले असताना सर्व यंत्रणांवर किती टोकाचा ताण आला हे देशाने पाहिले. तेथे अपघात घडला, सुदैवाने दुर्घटनेची व्याप्ती एका मर्यादेत राहिली. तामिळनाडू आणि बंगळुरुमधील घटनांमध्ये सुरक्षा यंत्रणांची बेफिकिरी हे मुख्य कारण आहे. अपेक्षेपेक्षा अधिक गर्दी होत आहे हे पाहिल्यावर तातडीने नियोजनात बदल करणे, अधिक संख्येने पोलिसबळ मागविणे आवश्यक होते. ते झाले नाही. राजकीय नेता होणे याचा अर्थ अधिक जबाबदारी येणे, हेच सद्यःस्थितीत कोणी मानण्यास तयार नाही. उलट, अधिकाधिक बेजबाबदार वर्तनाचा परवाना मिळाल्याचा थाट असतो! थलपती विजय आणि त्याच्या मेळाव्याचे नियोजन करणार्‍यांना मोठ्या संख्येने स्वयंसेवकांना नेमणे, त्यांना नियोजनात सामावून घेत पोलिस यंत्रणेला मदत करण्यासाठी सज्ज ठेवणे, हे करता आले असते. महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी लोकप्रियता वापरणार्‍यांना गर्दी हवी असते, मात्र; गर्दीची सुरक्षितता हा त्यांच्यासाठी प्राधान्याचा विषय असत नाही. गर्दीचा भाग होऊन आपण स्वतःला असुरक्षिततेच्या गर्तेत लोटत आहोत, याचे भान सर्वसामान्यांना होणे निकडीचे आहे. सत्ताधारी द्रमुक, मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना आव्हान देत 'थलपती'ने केलेले शक्तिप्रदर्शन त्याच्या चाहत्यांसाठीच महाग पडले आहे.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आता-पासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू ला-गला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...



स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(क्रमशः)

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवर्‍याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे


१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### आशिया कप जिंकल्यावर पाकिस्तानच्या संघाने काय केले असते? आफ्रिदीने सांगितला होता प्लॅन, पण स्वप्न राहिले..

मुंबई–आशिया कप २०२५ च्या फायनलमध्ये भारताने पाकिस्तानवर ५ विकेटने विजय मिळवला. यापूर्वी टीम इंडियाने दोनवेळा या स्पर्धेत पाकिस्तानला पराभूत केले. फायनलमध्ये भारताला पराभूत करण्याचं स्वप्न टीम इंडिया पाहत होती मात्र त्यांचं हे स्वप्न स्वप्नच राहिलं. आशिया कप जिंकण्यापूर्वी पाकिस्तान संघाने एक प्लॅन केला होता की जिंकल्यावर काय करायचं. पाकिस्तानचा माजी क्रिकेटर शाहिद आफ्रिदी आणि मोहम्मद युनूस यांनी आधीच हे भाकीत केले होते, परंतु त्यांची स्वप्ने पूर्णपणे भंगल पावली. आशिया कप ट्रॉफीबाबत मैदानात खूप नाटक पाहायला मिळालं. भारताने पाकिस्तानविरुद्ध बहिष्कार कायम ठेवला आणि अंतिम सामन्यात मोहसीन नक्वीकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. मात्र नक्वी सुद्धा त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिले आणि त्यांनी विजेत्या भारतीय संघाला ट्रॉफी न देताच ती परत नेली. पण ट्रॉफी नसतानाही टीम इंडियाने मोठ्या उत्साहात विजय साजरा केला. पाकिस्तानची स्वप्ने पूर्णपणे भंगली.

***

### 'ट्रॉफी तुमची नाहीये... एसीसी च्या कार्यालयात ठेवा', मोहसिन नक्वीला बीसीसीआयने सुनावले खडे बोल

दिल्ली–भारताने आशियाई क्रिकेट काउन्सिलच्या मिटिंगमध्ये एसी–सीचे चेअरमन मोहसिन नक्वी यांच्याबद्दल आपला विरोध दर्शवला. बैठकीत असलेल्या बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सुनिश्चित केले की नकवींनी टीम इंडियाला विजयाच्या शुभेच्छा द्यायला हव्यात. राजीव शुल्का आणि आशिष शेलार यांनी मागणी केली की आशिया कप ट्रॉफी लगेचच एसीसी मुख्यालयाला देण्यात यावी. भारताने पाकिस्तान क्रिकेटच्या प्रमुखांना हे देखील सांगितलं की ते हे प्रकरण आयसीसीपर्यंत नेणार आहेत. एसीसी प्रमुखांच्या वृत्तीचा निषेध म्हणून आशिष शेलार यांनी बैठकीमध्येच बहिष्कार टाकला. बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला आणि माजी खजिनदार आशीष शेलार यांनी केले होते. दोघेही एसीसी बोर्डाचे सदस्य आहेत. दोघांनी मिळून मोहसिन नक्वी यांनी आशिया कप ट्रॉफी दुबईतील एसीसी मुख्यालयात तात्काळ जमा करावी अशी मागणी केली आणि पाकिस्तानी संघाला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) पातळीवर हा मुद्दा उपस्थित करण्यास तयार असल्याचेही कळवले. नोव्हेंबरमध्ये याविषयी एक बैठक पार पडणार आहे.

***

### भारताला आशिया चषक ट्रॉफी कधी मिळणार? एसीसी च्या बैठकीत राजीव शुक्लांनी मोहसीन नक्वींना सुनावले

दिल्ली–आशिया चषक २०२५ स्पर्धा पार पडल्यानंतर आशियाई क्रिकेट परिषदेची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बीसीसीआयने पीसीबीचे मुख्य मोहसीन नक्वी यांना चांगलंच सुनावलं आहे. मंगळवार, ३० सप्टेंबर रोजी झालेल्या आशियाई क्रिकेट परिषदेच्या बैठकीत भारताने आशिया कपच्या अंतिम सामन्यानंतर झालेल्या ट्रॉफी वादावर तीव्र आक्षेप नोंदवला आणि एसीसी अध्यक्ष तसेच पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नकवी यांना चांगलेच प्रश्न विचारले.अंतिम सामन्यानंतर भारताने नकवी यांच्याकडून विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता, त्यानंतर नकवी यांनी ती ट्रॉफी स्वत:कडेच ठेवली. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करताना नक्वी यांना खणखणीत प्रश्न विचारले. शुक्ला यांनी स्पष्ट केलं की ट्रॉफी ही एसीसी ची मालमत्ता आहे, नक्वींची वैयक्तिक नाही. तरीही नक्वी यांनी ती आपल्या हॉटेलच्या खोलीत नेली.शुक्ला यांनी सांगितले की ट्रॉफी भारताला अधिकृत पद्धतीने सुपूर्द करणे आवश्यक आहे आणि एसीसी ने हा मुद्दा तात्काळ सोडवायला हवा.

***

### पाकिस्तानच्या खेळाडूंची शेरेबाजी सुरू होती, मी बॅटने उत्तर द्यायचे ठरवले– तिलक वर्मा

दिल्ली–मसुरुवातीचे तीन बॅट्समन झटपट माघारी परतल्याने माझ्यावर एकदम जबाबदारी आली. आततायी फटका मारून बाद झालो असतो तर देशवासीयांच्या विश्वासाला तडा गेला असता. शांतपणे खेळण्यावर भर दिला. पाकिस्तानचे खेळाडू काही बोलले तर लक्ष द्यायचं नाही हेही ठरवलं होतं. जे बोलायचं ते मी बोललो आहे पण मॅच सुरू असताना नाही बोललो. बऱ्याच गोष्टी सुरू होत्या. सगळ्याच मी सांगू शकत नाही. बॅट्समन आणि बॉलर यांच्यात काही ना काही सुरू राहतं. भारत–पाकिस्तान सामन्यात हे सुरू राहते. बॅटने उत्तर देणे कधीही चांगलेफ, असे आशिया चषकात फायनलचा नायक तिलक वर्माने हैदराबादमध्ये बोल–ताना सांगितले. तिलकचे मंगळवारी हैदराबाद इथे आगमन झालं. विमानतळावर परिसरात त्याचे भव्य स्वागत करण्यात आलं. त्याला पाहण्यासाठी हजारो चाहते जमले होते. प्रचंड प्रमाणावर पोलीस आणि सुरक्षायंत्रणांचा फौजफाटा तैनात करावा लागला.
तो पुढे म्हणाला, कर्णधार सूर्यकुमारने सांगितल्याप्रमाणे भारत–पाकिस्तान द्वंद्व वगैरे म्हणतात तसं राहिलेलं नाही या वक्तव्याशी मी सहमत आहे. प्रत्येक सामना वेगळा असतो.

# गतविजेत्या ऑस्ट्रेलियाची आज न्यूझीलंडशी सलामी

इंदूर : गतविजेता ऑस्ट्रेलियाचा संघ महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील आपल्या मोहिमेस आज, बुधवारपासून सुरुवात करणार असून सलामीला त्यांची न्यूझीलंडशी गाठ पडणार आहे. न्यूझीलंड संघात अनुभवी खेळाडूंचा समावेश असल्याने ते विक्रमी सात वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला कडवी झुंज देतील अशी अपेक्षा बाळगली जात आहे.

न्यूझीलंडच्या संघाने वर्षभरापूर्वीच संयुक्त अरब अमिराती येथे झालेल्या ट्वेन्टी–२० विश्वचषकाचे जेतेपद मिळवले होते. अमिराती आणि भारतातील खेळपट्ट्यांमध्ये बरेच साम्य आहे. याचा न्यूझीलंड संघाला निश्चितपणे फायदा होईल. मात्र, ऑस्ट्रेलियाच्या संघातही गुणवान फिरकी गोलंदाजांची भरणा आहे. त्यामुळे यंदाही जेतेपदासाठी त्यांना प्रबळ दावेदार मानले जात आहे.



न्यूझीलंड संघात अनुभवी खेळाडूंचा समावेश असल्याने ते विक्रमी सात वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला कडवी झुंज देतील अशी अपेक्षा बाळगली जात आहे.–एलिसा हिली

डावखुरी फिरकी गोलंदाज सोफी मोलिन्यू आणि लेग–स्पिनर जॉर्जिया वेरहॅम या दोघीही दुखापतींतून सावरल्या आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियन संघाला सलामीच्या लढतीपूर्वीच बळकटी मिळाली आहे. ऑस्ट्रेलियाकडे अन्य लेग–स्पिनर अलाना किंगचा पर्यायही उपलब्ध आहे. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीची भिस्त कर्णधार एलिसा हिली, एलिस पेरी आणि बेथ मूनी यांच्यावरच असेल.

ऑस्ट्रेलियाच्या संघाने नुकतीच भारताविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळली. भारतात झालेल्या या मालिकेत ऑस्ट्रेलियाने २–१ अशी सरशी साधली होती. त्यामुळे ऑस्ट्रेलियन खेळाडूंना भारतातील परिस्थिती आणि खेळपट्ट्यांशी जुळवून घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला आहे. याचा फायदा त्यांना सलामीच्या लढतीतच मिळणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## विजेत्या संघाला ट्रॉफी का दिली नाही? नक्वींना राजीव शुक्लांचा थेट सवाल



## आशिया कप ट्रॉफी वादावर बीसीसीआय आक्रमक!

दुबई: आशिया कप २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानला हरवून विजेतेपद पटकावले असले तरी, पारितोषिक वितरण समारंभातील नाट्यमय घडामोडींमुळे ट्रॉफीचा वाद चांगलाच चिघळला आहे. भारतीय संघाने एशियन क्रिकेट काऊन्सिलचे (-उउ) अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (झउइ) प्रमुख मोहसीन नक्वी यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास स्पष्टपणे नकार दिल्यानंतर नक्वी हे ट्रॉफी घेऊन मैदानातून निघून गेले होते.
या संपूर्ण प्रकरणावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (इउउख) आक्रमक झाले असून, मंगळवारी दुबईत झालेल्या एसीसीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (-ऋच्) बीसीसीआयच्या प्रतिनिधींनी हा मुद्दा जोरदारपणे उचलून धरला.

राजीव शुक्लांचा नक्वी यांना थेट सवाल

बीसीसीआयचे प्रतिनिधित्व करत असलेले उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी या बैठकीत मोहसीन नक्वी यांना थेट प्रश्न विचारला. विजेत्या संघाला ट्रॉफी का सोपवण्यात आली नाही? ही एसीसीची ट्रॉफी आहे, कोणाची वैयक्तिक मालमत्ता नाही. ती औपचारिक पद्धतीने विजेत्या संघाला दिली जावी लागते, असे शुक्ला यांनी स्पष्टपणे सांगितले.

मोहसीन नक्वींचे स्पष्टीकरण

यावेळी मोहसीन नक्वी यांनी बाजू मांडताना सांगितले की, मी तेथे एका कार्टूनसारखा उभा होतो. भारतीय संघ माझ्याकडून ट्रॉफी स्वीकारणार नाही, अशी कोणतीही लेखी सूचना एसी–सीला देण्यात आली नव्हती. तथापि, भारतीय प्रतिनिधींनी कठोर भूमिका घेतल्यावर नक्वी यांनी सांगितले की, या विषयावर इतर व्यासपीठावर चर्चा होईल, या बैठकीत नाही.

बीसीसीआयची मागणी

बीसीसीआयने या बैठकीत स्पष्ट मागणी केली आहे की, एशिया कपची ट्रॉफी त्वरित भारतीय संघाला सोपवण्यात यावी. ट्रॉफी न मिळाल्याने भारतीय संघाला विजेतेपदाचा आनंद ट्रॉफीसह साजरा करता आला नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे बीसीसीआयने म्हटले आहे.

## नेमबाजी स्पर्धेत जान्हवी देशमुखला कांस्य पदक

पुणे : डी.सी.एम. सोसायटी ऑफ इंडिया, पुणे संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कला महाविद्यालय पुणे येथील तीसर्या वर्षात शिकणारी कु. जान्हवी देशमुख हिने गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या १२व्या पश्चिम विभागीय नेमबाजी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना २५ मीटर पिस्टल शूटिंग या प्रकारात कांस्य पदक पटकावले आहे. विशेष म्हणजे, या कामगिरीच्या जोरावर तिची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी थेट निवड झाली आहे. त्यामुळे जान्हवीने केवळ महाविद्यालयाचा नाही तर पुण्याचाही गौरव वाढवला आहे.
जान्हवी ही महाविद्यालयातील प्राध्यापक रणजित देशमुख यांची कन्या असून, लहा




नपणापासूनच खेळात विशेष रुची असलेल्या जान्हवीने मागील काही वर्षांपासून नेमबाजी क्षेत्रात सातत्याने मेहनत घेतली आहे. तिच्या या यशामध्ये शिस्त, चिकाटी आणि सातत्याचा मोठा वाटा असल्याचे तिच्या प्रशिक्षकांनी सांगितले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डी. टी. राजपूत, जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास कांबळे, उपप्राचार्य डॉ. नरेश पोटे, जिमखाना विभाग प्रमुख अजय खुरपे, तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी जान्हवीचे अभिनंदन केले असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.ङ्गजान्हवीसारख्या विद्यार्थिनींच्या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन मिळते. शिक्षणाबरोबरच खेळामध्ये प्रावीण्य मिळवणार्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्यावतीने आवश्यक ते सर्व पाठबळ दिले जाते,फ असे प्राचार्य डॉ. कांबळे यांनी सांगितले.जान्हवीने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले, या यशामागे माझे पालक, महाविद्यालयाचे मार्गदर्शन व प्रशिक्षक यांचे मोठे योगदान

## दीप्ती–अमनजोतची दमदार अर्धशतके; श्रीलंकेसमोर २७० धावांचे आव्हान

गुवाहाटी: आयसीसी महिला वनडे विश्वचषक २०२५ च्या पहिल्याच सामन्यात भारताने यजमान श्रीलंकेसमोर २७० धावांचे मोठे आव्हान ठेवले आहे. गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना प्रत्येकी ४७ षटकांचा खेळवण्यात आला.
ारताची डगमगलेली सुरुवात आणि दिमाखदार पुनरागमन
भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर स्मृती मानधना (८) लवकर बाद झाली. त्यानंतर हरलीन देओल (४८) आणि पदार्पण करणारी प्रतिका रावळ (३७) यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, डावखुरी फिरकी गोलंदाज इनोका राणावीराने एकाच षटकात हरलीन, जेमिमाह रॉड्रिग्स (०) आणि कर्णधार हरमनप्रीत कौर (२१) यांना बाद करून भारताची अवस्था ५ बाद १२१ अशी बिकट केली.
दीप्ती आणि अमनजोतची शतकी भागीदारी
अत्यंत अडचणीच्या वेळी, अष्टपैलू दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौर यांनी भारताचा डाव केवळ सावरलाच नाही, तर मोठ्या धावसंख्येकडे नेला. या दोघींनी सहाव्या विकेटसाठी १०३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. दीप्ती शर्मा हिने ६४ चेंडूंमध्ये ५३ धावांची संयमी खेळी केली. अमनजोत कौर हिने केवळ ५८ चेंडूंमध्ये ५७ धावांची स्फोटक खेळी केली.
या दोघींच्या अर्धशतकांमुळे भारतीय संघाला सन्मानजनक धावसंख्या उभारता आली. त्यानंतर अखेरीस आलेल्या स्नेह राणाने १५ चेंडूंमध्ये २८ धावांचे उपयुक्त योगदान दिले.श्रीलंकेची प्रभावी गोलंदाजी
श्रीलंकेकडून इनोका राणावीरा हिने प्रभावी गोलंदाजी करत ४६ धावांत ४ बळी घेतले. उदेशिका प्रबोधनीने दोन बळी घेतले.भारताचा अंतिम स्कोअर
४७ षटकांत ८ बाद २६९ धावा.
(पावसामुळे डाव ४७ षटकांचा करण्यात आला).





## लग्नाच्या दुसऱ्याच महिन्यात रंगेहाथ पकडले; युझवेंद्रबाबत धनश्री वर्माचे खळबळजनक विधान

मुंबई –भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा मार्च २०२५ रोजी घटस्फोट झाला. दरम्यान, सध्या 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये धनश्री वर्मा सहभागी झाली आहे. या शोमध्ये धनश्री युझवेंद्रसोबतच्या घटस्फोटाबाबत अनेक खुलासे करत आहे. आता धनश्रीने नवीन खळबळजनक दावा केला आहे. लग्न झाल्यानंतर दुसऱ्याचे महिन्यात युझवेंद्र चहलला रंगेहाथ पकडला होता, असे विधान धनश्री वर्माने केले. धनश्री वर्माच्या या विधानाची सध्या सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे.युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्माने मार्च २०२५ मध्ये कायदेशीर घटस्फोट घेऊन आपले नाते संपवले. अशातच ज्यावेळी दोघांच्या घटस्फोटाच्या चर्चांनी जोर धरलेला, त्यावेळी धनश्रीने युजवेंद्र चहलकडे ६० कोटी रुपयांची पोटगी मागितल्याच्या चर्चांना उधाण आलेले. जे धनश्रीच्या कुटुंबानं अधिकृतपणे नाकारले. पण नेमके सत्य काय? याचा खुलासा आता स्वत: धनश्रीनं केला आहे. धनश्री सध्या 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोमध्ये दिसतेय. अलिकडच्याच एका भागात तिनं तिच्या घटस्फोटाबद्दल बोलताना म्हटले की, ६० कोटी रुपयांची पोटगी मागितल्याच्या सर्व चर्चा निराधार असल्याचे म्हटले आहे.कोण आहे धनश्री वर्मा?
धनश्री वर्मा एक यूट्यूबर आहे. ती डान्सर, कोरिओग्राफर आणि एक सोशल मीडिया एन्फ्लूएंझरही आहे. यूट्यूबवर तिच्या डान्स व्हिडीओंनी लाखो व्ह्यूज मिळतात. तिचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फॉलोअर्स आहेत. धनश्री अनेकदा लोकप्रिय बॉलिवूड गाण्यांचे नृत्यदिग्दर्शन करत व्हिडीओ पोस्ट करत असते.धनश्री वर्माची एकूण संपत्ती २५ कोटी रुपये असल्याचे म्हटले जाते. वेगवेगळ्या ब्रँड्सच्या जाहिराती करते. याच जाहिराती करण्याचे ती कोट्यवधी रुपये घेते. विशेष म्हणजे ती लवकरच एका दाक्षिणात्त्य चित्रपटात झळकणार आहे. दुसरीकडे युझवेंद्र चहलची संपत्ती ४५ कोटी रुपये असल्याचे म्हटले जाते.

# ते ट्रॉफी घेऊन पळून गेल, सूर्याने सांगितले प्रेझेंटेशन सेरेमनीमध्ये नेमके काय घडले?

दिल्ली–आशिया चषक २०२५ चा विजेता भारतीय संघ जेतेपद आपल्या नावे केल्यानंतर मायदेशी परतला आहे. भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव करत विक्रमी नवव्यांदा या स्पर्धेचे जेतेपद आपल्या नावे केले. पण जेतेपद पटकावल्यानंतर मात्र भारतीय संघ आशिया चषकाची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. यावरून मोठी चर्चा सुरू आहे, पण सूर्यकुमार यादवने नेमके मैदानावर काय घडले, हे सांगितले आहे.
भारताच्या आशिया चषक विजयानंतर तब्बल सव्वा तास उशिरा प्रेझेंटेशन सेरेमनी सुरू झाली. सूर्यकुमार यादवनुसार पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) प्रमुख मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर भारतीय खेळाडूंनी जवळजवळ एक तास वाट पाहिली. शेवटी, टीम इंडियाने ट्रॉफीशिवाय आनंद साजरा केला. नक्वी हे पाकिस्तानचे गृहमंत्री देखील आहेत.
सूर्यकुमार म्हणाला, ''आम्ही दार बंद करून ड्रेसिंग रूममध्ये गेलो नाही. सादरीकरण समारंभासाठी आम्ही कोणालाही वाट पाहायला लावली नाही. तेच ट्रॉफी घेऊन पळून गेले. मी हेच पाहिलं. काही लोक आमचे व्हिडिओ काढत होते, पण आम्ही तिथेच उभे होतो. आम्ही आत गेलो नाही.''
बीसीसीआय किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून भारतीय संघाने नक्वीकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्याची चर्चा होती, परंतु भारतीय कर्णधाराने असे वृत्त फेटाळून लावलं आणि म्हटलं की हा संघाचा मैदानावर घेतलेला निर्णय आहे.





सूर्यकुमार म्हणाला, ''सगळ्यात आधी तर मी हे स्पष्ट करतो की संपूर्ण स्पर्धेत, सरकार किंवा बीसीसीआयकडून कोणीही आम्हाला काही सांगितलं नाही की कोणाकडून ट्रॉफी स्वीकारायची किंवा नाही स्वीकारायची. आम्ही हा निर्णय स्वत: मैदानावर घेतला. ते (एसीसी अधिकारी) स्टेजवर उभे होते आणि आम्ही खाली उभे होतो. मी त्यांना स्टेजवर बोलताना पाहिलं आणि ते कशाबद्दल बोलत होते हे मला माहित नाही. काही चाहत्यांनी त्यांची हुर्यो उडवण्यासही सुरूवात केली. त्यानंतर आम्ही पाहिले की प्रतिनिधी ट्रॉफी घेऊन पळून गेले.''
सूर्यकुमार म्हणाला, सामना संपल्यानंतर भारताचे खेळाडू त्यांचे फोन घेण्यासाठीही ड्रेसिंग रूममध्ये गेले नाहीत. संघाचे सपोर्ट स्टाफ त्यांचे फोन मैदानात घेऊन आले. ''मैदानावरील प्रत्येकजण त्या क्षणाचा आनंद घेत होता. अभिषेक शर्मा, कुलदीप यादव, शिवम दुबे आणि तिलक वर्मा यांना पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण संघाने आनंद साजरा केला. सर्वांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या आणि त्यांच्यासाठी शिट्ट्या वाजवल्या. ही आमची संघ संस्कृती आहे.''
तासाभराने प्रेझेंटेशन सेरेमनी सुरू झाल्यानंतर पाकिस्तानला उपविजेता संघ म्हणून मेडल्स आणि बक्षीसाची रक्कम देण्यात आली. तर स्पर्धेतील काही वैयक्तिक पुरस्कार देण्यात आले. पण त्यानंतर सूत्रसंचालन करत असलेल्या सायमन डुलने भारतीय संघ आज आशिया चषकाची ट्रॉफी स्वीकारणार नसल्याचे जाहीर केले.

## लातूरच्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे राष्ट्रीय पातळीवरील किक बॉक्सिंग स्पर्धेत यश

**लातूर/प्रतिनिधी :**येथील अभिनव मानव विकास शिक्षण संस्था संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाने चेन्नई येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील किक बॉक्सिंग स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवले आहे.

श्रीकिशन सोमाणी विद्यालयात इयत्ता सातव्या इयत्तेत शिकणारा विद्यार्थी शिवम शिवाजी मठपती याने किक बॉक्सिंग स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करता ब्राँझ पदक पटकावले आहे. त्याला क्रीडा शिक्षक रुपाली कांबळे, गौरव राठोड, माणिक हाके यांचे मार्गदर्शन लाभले.

शिवम मठपती याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षिका - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय रील मेकिंग स्पर्धेत यश

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त पुण्यातील यादवराव तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन रील मेकिंग स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. द्वितीय वर्ष डी. फार्मसीचे विद्यार्थी कुलकर्णी कृष्णा तसेच संघातील सदस्य सुमित जाधव आणि निखिल दराडे यांनी तयार केलेल्या रीलला राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळाला. या संघाला



प्रा. श्रुती अंबाड यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, मा. ललितभाई शहा, मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा आदी मान्यवर पदाधिकारी यांनी विजयी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनीही या उत्कृष्ट यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. संदीपान जगदाळे सर यांचा ज्ञानप्रकाशच्या वतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक ३० /९ /२०२५ रोजी ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाच्या वतीने भारत शासन राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा.डॉ. संदिपान जगदाळे सर यांचा सन्मान करण्यात आला. प्रयोगशील शिक्षक, तबलावादक, गायक, शाहीर, लेखक, वक्ता, सांस्कृतिकदूत व सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखले जाणारे प्रा.डॉ.संदिपान जगदाळे सर यांना नुकतेच राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्ञानप्रकाशचे पालक असणाऱ्या , लातूरच्या शैक्षणिक जगतात भर टाकणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचा ज्ञानप्रकाशच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी मुलांशी संवाद साधताना जगदाळे सर म्हणाले चौकटीच्या पलीकडे जाऊन विचार करा. ध्येय मोठे ठेवा, यश मोठे मिळेल. अपयशामुळे खचून जायचे नाही. प्रयत्न करण्यात कसलीही कसूर करू नका.यावेळी जगदाळे सरांच्या हस्ते महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळाच्या वतीने घेतलेल्या गणित प्रज्ञा परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत आलेल्या सार्थक वळसंगे व राष्ट्रभाषा हिंदी बालवाणी परीक्षेत विभागातून पहिली आलेली अनुष्का पुणेकर या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.कार्यक्रमाच्या वेळी प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे, केंद्राच्या संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत ,पर्यवेक्षक अशोक गुरुदाळे व शिक्षक ,विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संपदा पांडे यांनी केले.

# रेणापूर येथील आदिशक्ती श्रीरेणुका देवी मंदिरात आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून सपत्नीक महापूजा

**लातूर/प्रतिनिधी :** असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात असून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी सकाळी सपत्नीक महापूजा करून भक्तीभावे दर्शन घेतले. नैसर्गिक संकटातून शेतकऱ्यासह सर्वसामान्य जनतेला सावरण्याची शक्ती मिळो, त्यांच्या जीवनात सुख समाधानाचे दिवस येवो अशी प्रार्थना केली.





प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रेणापूर येथे आदिशक्ती श्री रेणुका देवी नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांनी मंगळवारी सकाळी रेणुका मातेची महापूजा व आरती करून मनोभावे दर्शन घेतले. गेल्या काही दिवसापासून पावसामुळे सर्वत्र मोठे संकट निर्माण झाले असून या संकटातून शेतकऱ्यासह सर्वसामान्य नागरिकांना सावरण्याची शक्ती मिळावी, दिलासा मिळावा अशी प्रार्थना आ. कराड यांनी रेणुका मातेच्या चरणी केली. यावेळी मंदिर ट्रस्टच्या वतीने आणि रेणापूर शहर भाजपाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, दशरथ सरवदे, मंदिर ट्रस्टचे राम पाटील, तुकाराम कोल्हे, रमाकांत वाघमारे, पंडित माने, प्रशांत आकनगिरे, मनोहर व्यवहारे, शहाजी कातळे, दिलीप आकनगिरे, उडगे गुरुजी, रावसाहेब राठोड, राजू पुनपाळे, भाजपाचे चंद्रकांत कातळे, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, अनुसया फड, विद्याताई आकनगिरे, जयश्री कातळे, वसंत करमोडे, लक्ष्मण यादव, शालीक गोडभरले, ओम चव्हाण, श्रीकृष्ण पवार, राजकुमार मानमोडे, गणेश चव्हाण, संजय वीरुळे, धम्मानंद घोडके, संतोष राठोड, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, अंतराम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, अंकुश मोटेगावकर, दिलीप चव्हाण, सोपान सातपुते, लक्ष्मण खलंग्रे, हनुमंत भालेराव, अमृतेश्वर स्वामी, नंदकुमार बड़े, अंतराम चव्हाण, रफिक शिकलकर, शरद चक्रे, हनुमंत अकनगिरे, मनोज चक्रे, सुभाष राठोड, शेख अजीम, सचिन शिरसकर, टिकू दळवी, शिवा भावे, निवृत्ती येलाले, विकी राजे, आवेश कुरेशी, गणेश भोकरे, रोहित खुमसे, पप्पू कुडके, अजय गाडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आयोजित भव्य चित्र प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद





**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर येथील डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या वतीने मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या ३५ निवडक चित्रांच्या भव्य प्रदर्शनास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या चित्र प्रदर्शनाचे उदघाटन लातूर जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( सामान्य प्रशासन ) शाम वाखर्डे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. प्रभा यादव, मुख्याध्यापक व्यंकटराव भदाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाड्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे सर्वस्व हिरावून नेले आहे. बळीराजाच्या या नुकसानीमध्ये आपणही काहीशी मदत, सहकार्य करून खारीचा वाटा उचलावा या उद्देशाने डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले गेले. ओले रंग.. दप्तर गेले वाहून.. राष्ट्र आले धावून ! या संकल्पनेतून सदर उपक्रम राबविण्यात आला. कला शिक्षिका अंजली पांचाळ यांनी याकामी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाने यापूर्वी केदारनाथ आपत्ती , माळीण गाव दुर्घटना , दुष्काळग्रस्त ,, जम्मू-काश्मीर व केरळ पूरग्रस्तांना मदत अशा अनेक सामाजिक उपक्रमांतून सातत्याने भरघोस असे योगदान दिले आहे. नुकतेच राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी विद्यार्थ्यांचे योगदान महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री आणि पंतप्रधान कार्यालयानेही गौरवले आहे. या चिंता प्रदर्शनातून जमा होणारी रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीतून थेट पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. यावेळी आपले विचार व्यक्त करताना उप मुख्यकार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे यांनी या अभिनव उपक्रमाबद्दल डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा प्रकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्र प्रेमाची भावना रुजवण्याचे काम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्यस्थितीत हवामान बदलामुळे वातावरणातही आमूलाग्र असा बदल होताना दिसतोय. त्याचा परिणाम मानसिकतेवरही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी विविध माध्यमे उपलब्ध आहेत. युट्युब सारख्या माध्यमाचा वापर करून विद्यार्थी सर्वतोपरी ज्ञान संपादन करू शकतात. आपल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा केवळ जिल्ह्यापुरती मर्यादित नसून त्यांना राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. याची जाणीव ठेवून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिपूर्ण ज्ञान देण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहनही वाखर्डे यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या सचिव सौ. प्रभा यादव यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संग्राम मुसळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष निवृत्ती यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक व्यंकट भदाडे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संकटग्रस्तांना आधार देण्याकरीता आ. रमेशअप्पा कराड लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर

**लातूर/प्रतिनिधी :** सततचा मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावांना मोठा फटका बसला असून शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील अनेक नुकसानग्रस्त गावांचा दौरा करून नुकसानीची पाहणी केली राज्यातील महायुतीचे शासन शेतकऱ्यासह जनतेच्या पाठीशी खंबीरपणे असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.



लातूर ग्रामीण मतदार संघात सर्वत्र प्रचंड अतिवृष्टी आणि मुसळधार पाऊस झाला. नदी नाल्याना पुर आले. मुसळधार पावसाने आणि सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपाची हाताशी आलेली सोयाबीन, ऊसासह फळबागाचे प्रचंड नुकसान झाले. शेतात जिकडे, तिकडे पाणीच पाणी झाले. तर मांजरा नदीसह लहान मोठ्या सर्वच नाले, ओढे यांना पूर येऊन शेत जमिनी खरडून गेल्या. शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले. अनेकांच्या घराची पडझड झाली लातूर तालुक्यातील मौजे नागझरी, जेवळी, टाकळी, काडगाव, काडगाव तांडा, गाधवड, तांदूळजा, कानडी बोरगाव, निळकंठ, भोसा, मसला, भिसे वाघोली, माटेफळ, करकट्टा या गावातील नुकसानीची पाहणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी केली. शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा करून अडीअडचणी आणि व्यथा जाणून घेतल्या. राज्यातील महायुतीचे शासन आपल्या पाठीशी आहे नुकसान ग्रस्तांना निश्चितपणे मदत केली जाईल. नदी नालेकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यात येणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

या दौऱ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी पावसाने आणि पुराने नुकसानीत आलेल्या शेतीची, लहान, मोठ्या पुलाची पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. त्यांच्यासमवेत संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या. ठिकठिकाणी बोलताना राज्यातील महायुती शासन आपल्या पाठीशी आहे असे सांगून कानडी बोरगाव बॅरेजचे दरवाजे नादुरुस्त असल्याने दरवाजे उघडत नसल्यामुळे बेरीजचे पाणी शेतात जाऊन प्रचंड नुकसान झाले याची दखल घेऊन तात्काळ दरवाजे उघडून दुरुस्त करावेत अशा सूचना पाटबंधारे यांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

भिसेवाघोली येथे रस्त्यालगत खचलेल्या विहिरमुळे बस सेवा बंद झाली असून त्या ठिकाणी तात्काळ संरक्षण भिंत बांधण्याची संबंधितांना सूचना केली. निळकंठ गावालगतच्या ओढ्यावरील पुलाची तात्पुरती दुरुस्ती करून नाबार्ड योजनेतून नवीन पूल बांधण्याचा प्रस्ताव दाखल करावा त्याचबरोबर कळंब - लातूर मेन रोडवरील काडगाव येथील चौकात सातत्याने पाणी साचत असल्याने रस्त्याची उंची वाढवण्याची सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

या पाहणी दौऱ्यात भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, भाजपा मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड, शाम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, संभाजी वायाळ, गोपाळ पाटील, अशोक सावंत, सचिन लटपटे, योगीराज साखरे, अशोक गंगणे, प्रशांत शिंदे, महेश कणसे, लता भोसले, बाबासाहेब भिसे, अहमद शेख, शंकर चव्हाण, अमोल लोमटे, विकास लोंढे, शुभम खोसे त्याचबरोबर नायब तहसीलदार सरवदे, सहा.गटविकास अधिकारी चोरमले, जि.प. बांधकाम विभागाचे कुलकर्णी, बांधकाम विभागाचे बिराजदार, मराविमचे शेंडेकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व भाजपाचे कार्यकर्ते त्या त्या गावातील शेतकरी नागरिक व इतर अनेकजण होते.

# राष्ट्रीय वेलनेस क्राफ्ट-२०२५ स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूटची कु. सुजाता भालके प्रथम

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर तर्फे ''वेलनेस क्राफ्ट नॅशनल लेव्हल पेशंट काउन्सेलिंग व्हिडिओ क्लिप स्पर्धा-२०२५'' चे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते.

या स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या तृतीय वर्ष बी. फार्मसीची विद्यार्थिनी कु. सुजाता भालके व तिच्या संघात श्रद्धा देशमुख, शिवम गर्जे, रोमन शेख यांचा समावेश होता. या संघाने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवत संस्थेचे नाव गौरवले. उत्कृष्ट ज्ञान, संवादकौशल्य आणि रुग्ण मार्गदर्शनातील तिची प्रखर बांधिलकी यामुळे हे यश शक्य झाले असून या यशामागे प्रा. सुषमा पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दयानंद शिक्षण



संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, मा. ललितभाई शहा, मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा आदी मान्यवर पदाधिकारी यांनी सुजाता भालके तसेच सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१



# मध्य रेल्वे विशेष गाड्यांच्या कालावधीचा विस्तार करणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने प्रवाशांच्या वाढलेल्या गर्दीचा भार कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे:

१.ट्रेन क्रमांक ०१४३६ लोकमान्य टिळक टर्मिनस – सोलापूर साप्ताहिक विशेष गाडी जी पूर्वी ०१.१०.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०८.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (१३ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१४३५ सोलापूर – लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०७.१०.२०२५ ते ३०.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (१३ सेवा)

२.ट्रेन क्रमांक ०१४६१ सोलापूर – दौंड अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१४६२ दौंड – सोलापूर अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

३.ट्रेन क्रमांक ०१४६५ सोलापूर – कलबुरगि अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१४६६ कलबुरगि – सोलापूर अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

४.ट्रेन क्रमांक ०१०२३ पुणे – छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (कोल्हापूर) दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१०२४ छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (कोल्हापूर) – पुणे दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

५.ट्रेन क्रमांक ०१२११ बडनेरा – नाशिक रोड अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१२१२ नाशिक रोड – बडनेरा जं. अनारक्षित दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

६.ट्रेन क्रमांक ०१४८७ पुणे – हरंगुळ दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

ट्रेन क्रमांक ०१४८८ हरंगुळ – पुणे दैनंदिन विशेष गाडी जी पूर्वी ३०.०९.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता ०१.१०.२०२५ ते ३१.१२.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे. (९२ सेवा)

टीप–१

ट्रेन क्रमांक ०१४३७ सोलापूर – धर्मावरम विशेष गाडी जी ०२.१०.२०२५ पर्यंत चालवणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता सोलापूर येथून अनकापल्ले पर्यंत ०९.१०.२०२५ ते २७.११.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे.

ट्रेन क्रमांक ०१४३८ धर्मावरम – सोलापूर विशेष गाडी जी ०३.१०.२०२५ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आले होते, ती आता अनकापल्ले येथून ११.१०.२०२५ ते २९.११.२०२५ दरम्यान वाढविण्यात आली आहे.

टीप–२



खालील गाड्यांना मुरुड स्टेशनवर तत्काळ प्रभावाने थांबा देण्यात आला आहे:

ट्रेन क्रमांक ०१४३६ लोकमान्य टिळक टर्मिनस – सोलापूर एक्सप्रेस सकाळी २२.०४ वाजता

ट्रेन क्रमांक ०१४३५ सोलापूर – लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस संध्याकाळी १८.०० वाजता

ट्रेन क्रमांक ०१४८७ पुणे – हरंगुळ एक्सप्रेस सकाळी ११.२५ वाजता

ट्रेन क्रमांक ०१४८८ हरंगुळ – पुणे एक्सप्रेस दुपारी १५.१९ वाजता

आरक्षण: विशेष गाड्या क्रमांक ०१४३५, ०१४३६, ०१४३७, ०१०२४, ०१४८७ आणि ०१४८८ च्या वाढविण्यात आलेल्या फेऱ्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच संकेतस्थळ www.irctc.co.in वर उपलब्ध आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## लातूर येथे दिव्यांग बालकांसाठी ओळख व तपासणी शिबीर

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि. ३० : मुंबई उच्च न्यायालयाच्या बाल न्याय समितीच्या १७ जुलै २०२५ रोजीच्या आदेशानुसार लातूर येथील दिव्यांग बालकांची तपासणी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी ओळख व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि जिल्हा पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर येथे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात लातूर येथील दिव्यांग बालकांनी त्यांच्या पालकांसह उपस्थित राहून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका, सचिव व्ही.एन. गिरवलकर, आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी सीआरपी प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर : दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि रोटरी सॅटेलाईट क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व कर्मचारी वर्गासाठी संपूर्ण कार्डिओपल्मनरी रीससिटेशन प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश तरुण कॅडेट, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना जीवन वाचविण्याच्या महत्त्वपूर्ण कौशल्यांची सक्षम करणे हा होता, ज्यामुळे आपत्कालीन प्रसंगी निर्णायक फरक पडू शकतो. तीनशेहून अधिक विद्यार्थी या कार्यशाळेत उपस्थित होते. या सत्रात सैद्धांतिक ज्ञाना सोबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देखील घेण्यात आली.




प्रसिद्ध भूलतज्ज्ञ व मॅरेथॉन पटू डॉ. आरती झंवर आणि डॉ. विनोद लड्डा (संचालक, लड्डा मेडिकल क्लासेस) यांनी सहभागींना सी.आर.पी.ची पायरी–पायरीने प्रक्रिया समजावून सांगितली. त्यात छातीवरील दाब, कृत्रिम श्वसन (रेस्क्यू ब्रीदिंग) तसेच आपत्कालीन प्रतिसाद पद्धतींचा समावेश होता. कार्यशाळेत तातडीच्या वैद्यकीय हस्तक्षेपाचे महत्त्व, ऑटोमेटेड एक्स्टर्नल डिफिब्रिलेटर्स चा वापर आणि आरोग्य आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपायांची माहितीही देण्यात आली.

या प्रसंगी कार्यशाळेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांची आवश्यकता अधोरेखित करताना सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व नेतृत्वगुणांचा विकास करणे एवढेच आमचे ध्येय नाही, तर त्यांना जबाबदार नागरिक बनविणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, जे संकटाच्या काळात जीव वाचवू शकतील. असे प्रतिपादन केले.तसेच रोटरी सॅटेलाईट क्लबच्या प्रतिनिधींनी समाजसेवेसाठी आपली बांधिलकी व्यक्त केली तसेच विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाचे कौतुक केले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळवून गेली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास व्यक्त केला की त्यांनी शिकलेली नवी कौशल्ये प्रत्यक्षात उपयुक्त ठरतील. आयोजकांनी पुढेही अशा संयुक्त प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करून समाजात जनजागृती व आपत्कालीन तयारीबाबत जागरूकता वाढवण्याची घोषणा केली. कार्यशाळेचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. गोपाल बाहेती यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. महेश जंगापल्ले यांनी केले. या कार्यशाळेला उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी,एन एन सी समन्वयक डॉ. शिवकुमार राऊतराव, महाविद्यालयीन प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, एनसीसी कॅडेट्स आणि ३०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

## गांधीजी ..

नोटे वरले गांधीजी
प्रिय वाटती सकला
खिशात भरता नोटा
माणूसजाई विकला

सत्यमेव जयते बोले
कितीकरालं नकला
स्पष्ट दिसे हिंसकता
आरशां पहा शकला

गांधीविचार अवघड
अवजड का शृंखला
काल बाह्य समजतो
आचार ते विसृंखला

सेल्फी वुईथ चरखा
आब केवढा राखला
खादी घालून दाखवे
गांधीवादाचादाखला

जयंती न् पुण्यतिथी
कमरेतून तू वाकला
फक्त समारोहापुरता
मोद सिमीत टिकला

नाव घेऊन बापूजींचे
निवडणूका जिंकला
उपोषण उठसूठ करे
विरोध मार्ग आखला

राज घाटा नतमस्तक
सत्तेचास्वाद चाखला
नथु राम कसा टपला
रूतूनबसला चिखला

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडून हरंगुळ (खु) येथील अतिवृष्टीग्रस्त शेतीची पाहणी; तात्काळ मदत देण्याच्या सूचना

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, मंगळवार, ३० सप्टेंबर रोजी लातूर तालुक्यातील हरंगुळ (खुर्द) येथे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांची पाहणी केली.

सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी त्यांनी शेतकरी शरद संभाजी पवार यांच्या शेतात जाऊन सोयाबीन पिकाची पाहणी केली आणि शेतकरी बांधवांशी संवाद साधला. पंचनामे पूर्ण करून तात्काळ मदत देण्याच्या सूचना: आमदार देशमुख यांनी यावेळी उपस्थित असलेल्या संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून, पंचनामे तातडीने पूर्ण करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाईची मदत देण्याच्या सूचना केल्या. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती–जगदीश बावणे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष– अभय साळुंके,



नायब तहसीलदार– सुधीर कांबळे, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, सहाय्यक गटविकास अधिकारी सतीश चोरमले, उपकृषी अधिकारी श्री.सोळंके, मंडळ कृषी अधिकारी अण्णाराव वाघमारे, कृषी सहाय्यक यु.डी.चव्हाण, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, जिल्हा परिषद शाखा अभियंता– प्रिया पाटील, आनंद पवार, मनोहर लिंबाजी झुंजे पाटील, भीमाशंकर झुंजारे, उमाकांत भुजबळ, राम स्वामी, धनराज पाटील, श्याम बरूरे, मंडळ अधिकारी रामराव झाडे, तलाठी बालाजी राठोड, राजकुमार झुंजे पाटील, सोमनाथ झुंजे पाटील आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी, नागरिक उपस्थित होते.

# जयभवानी मातेचा गाभारा चौदिघरच्या महीला भजनीने फुलवला





**लातूर/प्रतिनिधी :** येथील भवानी चौकाती जय भवानी चॅरिटेबल ट्रस्टच्या भवानी माता मंदीरात नवरात्री निमीत्त्य माता भवानीचा जागर सादर करताना चौदाघर मठ महीला भजनी मंडळ सदश्या सुनिता स्वामी, शिवकांता स्वामी, मिना स्वामी, सविता स्वामी, जयश्री स्वामी, शकुंतला बावगे,मिरा बावगे,शांता बावगे, दैवा हालके, दैवा जयशेटे, ललीता बिडवे, कुसुम पुदाले, अनिता आवाळे, कुसुम मिटकरी, संगीता ढेकणे,बेबीसरोजा स्वामी, रेणुका स्वामी,अनिता तिवारी, शिवगंगा कंगले ह्या उपस्थित होत्य श्री जयभवानी माताची आरती कविता स्वामीच्या हस्ते करण्यात आली मन्मथ बिडवे, व पेटी वादक राहुल लखादिवे,तबला आकाश गवळी, ढोलकीची साथ महेश राजमाने आदीनी जयभवानी मंदीराचा गाभारा स्वरांनी फुलवला.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६